## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - २१५/२०२२/अहमदनगर**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शकील अल्लाबक्ष शेख,<br>मु. पो. बेलापूर बु., गाढे गल्ली,<br>ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>वैद्यकीय अधीक्षक,<br>ग्रामीण रुग्णालय नेवासा,<br>नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>जिल्हा शल्य चिकित्सक,<br>जिल्हा रुग्णालय, तारकपूर, सावेडी रोड, अहमदनगर,<br>ता. जि. अहमदनगर. | : | प्रतिवादी |

**<u>सुनावणी दिनांक - ०८/१२/२०२२</u>**

अपिलार्थी यांनी दिनांक २३/१२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०८/१२/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित** - सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दिनांक ०१/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्व्ये दिनांक ०६/०३/२०१० ते दिनांक ०६/०९/२०२१ या कालावधीतील रुक्सार राजु शेख यांना दिलेल्या माहितीबाबत पुढीलप्रमाणे एकुण ६ मुद्यांची माहिती मागितली होती. १) ग्रामीण रुग्णालयात कार्यरत असलेल्या श्रीमती रुक्सार राजु शेख यांना जा.क्र. ग्रा.रु. ने/आस्था/३३४/१० दि.६/०३/२०१० हे पत्र कोणत्या रेकॉर्डवरुन दिले त्याबाबत माहिती व माहिती देणारे अधिकाऱ्याचे नांव, २) कार्यालयाने दिनांक ०३/०९/२०१० रोजी जा.क्र. ग्रारुने/मा.अ./१२७८/२०१० अन्वये दिलेली माहिती कोणत्या रेकॉर्डवरुन दिली व माहिती देणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव, ३) कार्यालयाने दिनांक १२/११/२०१० रोजी जा.क्र. ग्रारुने/मा.अ./१६६७/२०१० अन्वये दिलेली माहिती कोणत्या रेकॉर्डवरुन दिली व माहिती देणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव, ४) कार्यालयाने जा.क्र. ग्रा.रु.ने/आस्था/३३५/२०२१ दि. ०६/०९/२०२१ रोजी दिलेली माहिती मा कोणत्या रेकॉर्डवरुन दिली व माहिती देणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव तसेच रुक्सार राजु शेख यांनी सदरचा अर्ज कोणत्या अधिकारात दिला, माहिती कोणत्या तरतुदीनुसार दिली, उपलब्ध सर्व रेकॉर्डच्या प्रती, ५) जा.क्र. ग्रा.रु.नं/आस्था/३३/२०२१ दि. ०६/०९/२०२१ रोजी दिलेल्या कागदपत्रापैकी हजेरीपट, त्यामधील सहीच्या ठिकाणी खाडाखोड असल्याबाबत संबंधित कर्मचारी यांचेवर केलेल्या कारवाईचा तपशिल, तसेच डेली कॅज्युअल्टी मेडीसीन ॲण्ड इंजेक्शन रजिष्टर कोण मेंटेन

करते त्या कर्मचाऱ्यांचे नांव व पद तसेच ६) कार्यालयाने घातक औषध द्रव्यांची नोंदवही, दररोजच्या इंजेक्शन, मेडीसीन हिशोब यांच्या ज्या प्रती श्रीमती रुक्सार राजु शेख यांना दिल्या ते मेंटेन करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नांव व पद याबाबत सविस्तर माहिती मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक २०/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, माहिती अर्जाचे अवलोकन केले असता सदर माहिती ही त्रयस्थ पक्षाशी निगडीत असुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार व्यापक जनहिताशी संबंध असलेली वैयक्तिक स्वरुपाची माहिती न पुरविण्याबाबत शासन निर्णय/शासन परिपत्रक क्रमांकक संकिर्ण २०१२/१८९/प्र.क्र.४७९/सहा, मंत्रालय मुंबई ४०००३२ तारीख १७/१०/२०१४ प्रमाणे प्रदर्शित झाले आहे, प्रमाणे शासन निर्णयाची प्रत देण्यात येत आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक २७/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दिनांक ०२/१२/२०२१ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले उत्तर योग्य असल्याचे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढले. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, प्रथम अपिलाच्या सुनावणीदरम्यान अपिलीय अधिकारी यांनी मागितलेली माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असुन शासन निर्णय/शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०१२/१८९/प्र.क्र.४७९/सहा, मंत्रालय मुंबई ४०००३२ तारीख १७/१०/२०१४ नुसारच्या शासन निर्णयानुसार माहिती देता येत नाही व माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ पोट कलम (त्र) मधील तरतुदीनुसार लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषतः जी त्रयस्थ पक्षाबरोबर उद्भवलेल्या वैयक्तिक वादांच्या अनुषंगाने मागितलेली माहिती अधिकारात देण्यात येऊ नये असे सांगितले. तसेच सदरील माहिती अधिकार अर्जामध्ये संबंधित अर्जदाराला शासन निर्णय परिपत्रकाची प्रत सोबत जोडुन आली होती. सदर मुद्यांबाबत अर्जदाराचे समाधान झाले असुन त्यांचे काहीही म्हणणे नसुन अर्ज निकाली काढण्यात येते.

सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी वैयक्तिक माहिती मागितली आहे. सदर माहिती यापुर्वी दिली आहे, त्या माहितीच्या संदर्भात माहिती अर्जात टाकला असुन त्या अभिलेख्यांसंदर्भात माहिती विचारली आहे. तसेच अपिलार्थी यांनी सांगितले की, प्रथम अपिलाच्या सुनावणीस उपस्थित होतो मला माहिती मिळाली नाही. माहिती अर्जात ज्या पत्राचा उल्लेख केला आहे, ते सर्व पत्र यापुर्वी दिलेल्या माहिती दिनांक ०६/०३/२०१० रोजी नमुद आहेत. त्या पत्राबाबत माहिती विचारली होती. तरी सदरची माहिती मिळावी.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०१/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार व्यापक जनहिताशी संबंध असलेली वैयक्तिक स्वरुपाची माहिती न पुरविण्याबाबत शासन निर्णय/शासन परिपत्रक क्रमांकक संकिर्ण २०१२/१८९/प्र.क्र.४७९/सहा, मंत्रालय मुंबई ४०००३२ तारीख १७/१०/२०१४ प्रमाणे देता

येत नाही, असे वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविल्याचे स्पष्ट होते. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस माहिती देता येत नसल्याबाबत कळविले आहे. वास्तविक अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील २(च) मधील तरतुदीनुसार माहितीच्या व्याख्येत मोडते. म्हणुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविणे आवश्यक होते.

या प्रकरणी अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती मुद्देनिहाय पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधक्षिक, ग्रामीण रुग्णालय, नेवासा, [illegible], ता. नेवासा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०१/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. जी माहिती पुरविता येत नाही, त्याबाबत स्पष्ट कारणे देखील कळविण्यात यावीत.

२) वरील आदेशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक २१५/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

**प्रति,**

उप संचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय आवार, शालीमार चौक, नाशिक-०१, ता. जि. नाशिक.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

क्र.रामाआ-नाशिक/द्वि.अ.क्र. २१५/२०२२/अहमदनगर/ओ - ४०४ दिनांक 22/02/2023